# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक


संदर्भ क्र. विविमं/२०१८–१९/३६ दिनांक : ०२/०७/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : सन २०१८ मधील वृक्ष लागवडीबाबत.**

महोदय/महोदया,

मा. वनमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी हरित महाराष्ट्र अभियान ही संकल्पना २०१६ या वर्षीपासून सुरू केली असून दि. ०१ जुलै, २०१६ रोजी सुमारे २ कोटी वृक्ष लावण्याचा संकल्प पूर्णत्वास नेला. या अभियानाचा पुढचा टप्पा म्हणून सन २०१७, २०१८ आणि २०१९ या तीन आर्थिक वर्षात ५० कोटी वृक्ष लागवडीचे ध्येय निश्चित करण्यात आले.

वर्ष २०१८–१९ मध्ये १३ कोटी वृक्ष लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. दिनांक १ जुलै ते ७ जुलै २०१८ दरम्यान राज्यात ही वृक्ष लागवड करण्याचा निर्णय राज्य शासनाच्या वनविभागाने घेतला आहे, आणि तशा आशयाचे सविस्तर निर्देश व आवाहन शासनाने महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापीठाच्या कुलगुरूंना केले आहे. राज्यातील वृक्षाच्छादन वाढावे व त्या माध्यमातून हरित महाराष्ट्र संकल्प साकार व्हावा यादृष्टीने येत्या तीन वर्षात ५० कोटी वृक्ष लागवड करण्याबद्दल शासन परिपत्रकान्वये या अगोदर वारंवार कळविण्यात आले आहेच. त्यानुसार प्रत्येक शैक्षणिक व प्रशासकीय विभागाने ह्यावर्षी १३ कोटी वृक्ष लागवड करण्याच्या व्यापक व महत्वाकांक्षी अभियानात सहभागी होण्याबाबत आपणास सूचित करण्यात आले आहे, आणि या परिपत्रकाद्वारे पुन्हा एकदा आवाहन करण्यात येत आहे.

याबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. सदर पत्र आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्थेत/पदव्युत्तर विभागातील मुख्य सूचनाफलकांवर प्रदर्शित करून विद्यार्थी/शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावेच, पण **आपणही प्रशासकीय व संरचनात्मक पातळीवर वृक्ष लागवडीचे अभियान यशस्वी करावे.**

आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेमध्ये **माहे जुलै २०१८ मध्ये केलेल्या अक्षांक्ष व रेखांशासह वृक्ष लागवडीची माहिती व छायाचित्रे** पुढील लिंकवर **(www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu – Students Developement – Menu – Gov/Institute joint scheme proposal Report– Tree Plantation Programe Report 2018-19) दि. १२/०७/२०१८ पर्यंत** भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

सदर माहिती महाराष्ट्र शासनाकडे निर्गमित करावयाची असल्याने प्राधान्याने माहिती पाठविण्यात यावी. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ